**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pu**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary. stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-३/३२५६
दिनांक- १९/०६/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषयः-** जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांच्या मुदतवाढीबाबत...

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे-

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा (नियमित व विलंब शुल्कासह) | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| विलंब शुल्क | शनिवार, दिनांक १५/०६/२०१९ ते सोमवार, दिनांक २४/०६/२०१९ | सोमवार, दिनांक २४/०६/२०१९ ते शनिवार, दिनांक २९/०६/२०१९ | मंगळवार दिनांक ०२/०७/२०१९ |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवदेनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रुवारी-मार्च २०१९ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाइन घेता येईल.

२. श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०१९ व फेब्रुवारी-मार्च २०२० अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या **Virtual Account** व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

४.मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क एच.डी.एफ.सी. (HDFC Bank)बँकेत **Virtual Account** व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५. अमरावती, नाशिक व कोकण विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क गतवर्षीप्रमाणे ॲक्सिस बँक (AXIS Bank) बँकेत **Virtual Account** व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६. विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

७. आवेदनपत्रांसोबत विलंब शुल्क भरल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया पूर्ण होणार नाही ही बाब सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निर्दशनास आणून देण्यात यावी.

८. आवेदनपत्रे विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये यापुढे कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे -०४